महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ८८९७ दि.- ०७/०३/२०२४

---

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.)

दिनांक – २७ / ०२ /२०२४ दिनांक – सकाळी ११.०० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

---

प्रति,

**श्री. विष्णू नारायण मोरे**
**सुभाष नगर स नं ७, घर नं ७७७,**
**शेषनाग तरुण मंडळ जवळ वडार वस्ती,**
**येरवडा, पुणे – ४११०६** } अपिलार्थी

श्री राजेश फटाले
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता

---

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री विष्णू नारायण मोरे माहिती अधिकारातीलयांचा मा (जातील यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले) २३ /०१ /२०२४ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता विभाग, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका आ. क्र.१००८९ दि. २३ /०१ /२०२४ यांना दिनांक ( यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) रोजी प्राप्त झाला.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| ०५ /१२ /२०२३ | आ क्र ८५४४<br>०५ /१२ /२०२३ | ०४ /०१ /२०२३ | जा क्र – ६३११<br>१२ /१२ /२०२३ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती अद्याप आवश्यक माहिती मिळाली नाही त्यामुळे अपीलार्थी त्यांचा अपिल अर्ज दिनांक २३/०१/२०२४ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्तझाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| २३ /०१/२०२४ | २३ /०१ /२०२४ | अपिल अर्ज मुदतीत आहे |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि. २७/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –

| .क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | सर्व PT शौचालायांची देखभाल व्यवस्था कोणामार्फत केली जाते प्रत्येक शौचालायांस असणारे भाडे व अँग्रीमेंट कॉपी ( सुरवाती पासून आजपर्यंत ) मिळावी. | श्रीजनमाहितीअधिकारी तथाउप अभियंता घनकचरा व्यवस्थापन यांच्याकडे बिबवेवाडी कार्यालयाकडील जा क्र६३११दि.१२/१२/२३ ने सदर पत्रान्वये यांना आमचे कार्यालयाकडील अभिलेखांचा शोध शोध घेऊन सुलभ शौचालय अग्रीमेंट कॉपी आकारण्यात येणारे मासिक भाडे संबधित संस्था मालक किवा एजन्सी यांच्याशी झालेल्या कागदपत्रांची पत्र इ. अभिलेखा आढळून येत नसल्याचे विहित मुदतीमध्ये कळविण्यात आले आहे . |

**विवेचन**

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक २७/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री विष्णू नारायण मोरे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री राजेश फटाले जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता स्थापत्य विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच श्रीमती संपदा काळे सहा जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता बिबवेवाडी कार्यालय, उपस्थित होते.

अपिलार्थी श्री विष्णू नारायण मोरे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जात विचारलेली माहिती अपिलार्थी यांना अद्याप माहिती मिळाली नाही. त्यामुळे अपिल अर्ज दाखल केला असल्याचे विवेचनात नमूद केले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्याकडे बिबवेवाडी कार्यालय जा क्र ६३११ दि.१२/१२/२०२३ सदर माहिती बाबत अभिलेखांची पहाणी केली असता माहिती आढळून येत नाही असे सांगितले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले आदेश'</u>**

पुढील प्रमाणे पारित आदेशानुसार,जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सदर जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता घनकचरा व्यवस्थापन विभाग यांना बिबवेवाडी कार्यालय जा क्र दि. १२/१२/२०२ यांच्या मार्फत उपरोक्त माहिती दिल्यामुळे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

( प्रदीप आव्हाड )
**अपिलीय अधिकारी तथा**
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगपालिका

**<u>टिप –</u>**

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.orgया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

१. श्री राजेश फटाले ,जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता स्थापत्य विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
२. श्रीमती संपदा काळे सहा जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता स्थापत्य विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका